# माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा
## फेब्रुवारी 2007

बैठक क्रमांक

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

प्रश्नपत्रिका कोड क्रमांक

| | | | |
|---|---|---|---|
| 0 | 1 | 1 | 1 |

## भाषा (मराठी)

एकूण गुण : 100

वेळ : 11.00 ते 12.00

*सर्वसामान्य सूचना :—*

*(1) खाडाखोड केलेली अगर गिरवलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.*

*(2) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग असून, विभाग 1 साठी 20 गुण व विभाग 2 साठी 80 गुण आहेत.*

### विभाग 1

**(गुण — 20)**

***सूचना :—(1) प्रश्न क्रमांक 1 व 2 उत्तरपत्रिकेच्या विभाग 1 मध्येच लिहावेत.***

***(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 10 गुण आहेत.***

***(3) सुंदर हस्ताक्षर व टापटीप यासाठी दोन गुण राखून ठेवलेले आहेत.***

1. खालील विषयावर **दहा** ओळी निबंध लिहा. त्यासाठी दिलेल्या मुद्द्यांचा उपयोग करा :

*'स्वच्छता तेथे प्रगती'*

(**मुद्दे** : स्वच्छतेचे महत्व—स्वच्छतेचे फायदे—विकासाकडे वाटचाल)

2. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे **दहा** ओळींत कल्पनाविस्तार करा :

*"न ऋण जन्मदेचे फिटे"*

(**मुद्दे** : (1) उक्तीचा अर्थ, (2) स्पष्टीकरण, (3) उदाहरणे)

## विभाग 2

(गुण — 80)

*सूचना :—(1) या विभागातील उत्तरे उत्तरपत्रिकेच्या विभाग 2 मध्येच लिहा.*

*(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 2 गुण आहेत.*

*(3) या विभागातील 3 ते 42 प्रश्नांना प्रत्येकी चार पर्यायी उत्तरे दिली आहेत. त्यापैकी योग्य उत्तराचा पर्यायक्रमांक उत्तरपत्रिकेत संबंधित प्रश्नक्रमांकासमोरील दिलेल्या मोकळ्या चौकटीत लिहा.*

*(4) शक्यतो खाडाखोड करू नये. एकदा नमूद केलेल्या उत्तरावर गिरवू नये. अशी दुरुस्त केलेली उत्तरे ग्राह्य धरली जात नाहीत.*

*(5) उत्तराची दुरुस्ती करताना चौकोनातील उत्तर क्रमांकावर [3] अशा प्रकारे तीन आडव्या रेषा माराव्या व बदललेल्या उत्तराचा पर्याय क्रमांक चौकोनापुढे उजव्या बाजूस लिहावा. जसे [3] 2.*

*(6) उत्तराची दुरुस्ती प्रत्येक प्रश्नासाठी फक्त एकदाच मान्य होईल.*

*(7) एका विषयासाठी दुरुस्त केलेल्या जास्तीत जास्त पाच उत्तरांची दुरुस्ती ग्राह्य धरण्यात येईल.*

**प्र. 3. ते 7. → खाली दिलेला उतारा काळजीपूर्वक वाचा त्याखाली दिलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी उत्तराचे चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्यायाची निवड करून त्याचा क्रमांक उत्तरपत्रिकेत प्रश्नक्रमांकासमोरील चौकटीत लिहा.**

पांढरा शुभ्र फ्रॉक घालून एखादी हसरी चिमुरडी जर तुमच्या पुढ्यात उभी राहून म्हणाली की, 'माझं नाव सायली !' तर आवडेल ना ? सायलीचं नाजूकपण तसंच आहे. चमेली जशी जाईची जुळी बहीण, तशी सायली जुईची बहीण आहे. तशी सारख्याच आकाराची, सारख्याच रंगाची ही सुवासिक फुलांची वेल. जुईसारखीच तीन दलांची हिची पानं. पण जुईसारखं मधलं दल लांबट नसतं. तेही इतर दोन पानांएवढंच

असतं आणि फूल जाईसारखं अतिकोवळं ! इंदिराबाईसारखी कवयित्री या कोवळेपणाची काळजी करत पावसालाही दटावते—

नको नको रे पावसा,
असा धिंगाणा अवेळी
माझे घर चंद्रमौळी
आणि दारात सायली.

3. उताऱ्यात किती फुलांचा उल्लेख आला आहे ?

(1) चार (2) पाच
(3) सहा (4) तीन

4. खालीलपैकी कोणत्या फुलाचं मधलं दल लांबट नसतं ?

(1) जाई (2) जुई
(3) सायली (4) चमेली

5. उताऱ्यातील फुलांना कोणते विशेषण सार्थ ठरेल ?

(1) गेंदेदार (2) सुवासिक
(3) भडक रंगाची (4) बिनवासाची

6. उताऱ्यात कोणत्या कवयित्रीचा उल्लेख आला आहे ?

(1) पद्मा गोळे
(2) बहिणाबाई चौधरी
(3) वृंदा लिमये
(4) इंदिरा संत

7. उताऱ्यात वर्णन केलेली हसरी चिमुरडी कोण ?

(1) चमेली (2) सायली

(3) जाई (4) जुई

**प्र. 8. ते 12. → खालील संवाद वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या योग्य उत्तराचे पर्याय क्रमांक चौकटीत लिहा.**

सतीशचा वाढदिवस असल्याने तो म्हणाला,

''बाबा, परवा मला नवीन ड्रेस आणायचा बरं का !''

''अरे पण सात वाजले, अजून शाळेत गेला नाहीस ?''

''अहो बाबा, त्याची शाळा दुपारसत्रात आहे.''

''आई, मीना व रूपा आल्या आहेत, मी शाळेत जाते,'' स्वाती.

''स्वाती, डबा नेण्यास विसरू नको आणि हो उद्या रविवारची सुट्टी आहे ना ? की नेहमीसारखा खो-खोचा सराव ?''

8. हा संवाद कोठे व कधी घडला ?

(1) सकाळी ८ वाजता शाळेत

(2) दुपारी २ वाजता घरात

(3) सकाळी ७ वाजता रस्त्यात

(4) सकाळी ७ वाजता घरात

9. दुपारची शाळा कोणाची आहे ?

(1) मीना (2) सतीश

(3) स्वाती (4) रूपा

10. वाढदिवस कोणत्या दिवशी आहे ?

(1) रविवार (2) शुक्रवार

(3) शनिवार (4) सोमवार

11. शाळा दुपारसत्रात आहे असे कोण म्हणाले ?

(1) मीना (2) स्वाती

(3) सतीशचे वडील (4) मीनाची आई

12. वरील संवादामध्ये किती जण सहभागी आहेत ?

(1) चार (2) पाच

(3) सात (4) सहा

**प्र. 13. ते 17. → खाली एका सुसंगत परिच्छेदाची पाच वाक्ये दिली आहेत. परिच्छेदाची वाक्ये पूर्ण करण्यासाठी योग्य शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.**

13. आमच्या शाळेला ५० वर्षे पूर्ण झाल्यामुळे शाळेत............महोत्सव झाला.

(1) सुवर्ण (2) हीरक

(3) अमृत (4) रौप्य

14. यावेळी कार्यक्रमाचे............माननीय राज्यपालांच्या हस्ते झाले.

(1) उद्घाटन (2) प्रकाशन

(3) दिग्दर्शन (4) मार्गदर्शन

15. उत्सवाच्या सांगता समारंभात सर्व माजी मुख्याध्यापकांचा कृतज्ञतापूर्वक............करण्यात आला.

(1) स्वीकार (2) समारोप

(3) संस्कार (4) सत्कार

16. या कार्यक्रमात उत्सवाची एक............प्रकाशित करण्यात आली.

(1) दिनदर्शिका (2) कालदर्शिका

(3) स्मरणिका (4) कार्यक्रमपत्रिका

17. आता १० वर्षानी............समारंभ साजरा करू असा मनोदय सर्वांनी व्यक्त केला.

(1) सुवर्णमहोत्सवी (2) हीरकमहोत्सवी

(3) अमृतमहोत्सवी (4) रौप्यमहोत्सवी

**प्र. 18. ते 22. → कविता वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे शोधा व त्याचे पर्याय क्रमांक लिहा.**

उठुनि प्रभाती ती मधमाशी ॥
जाते की मध मिळवायासी ॥
थेंबे थेंबे साठवि त्यासी ॥
उद्योगी मोठी ॥ १ ॥

आळस तिजला ठाऊक नाही ॥
सर्व दिवस ती खपते पाही ॥
थंडी ऊन म्हणेना काहीं ॥
उद्योगी मोठी ॥ २ ॥

गोड गोड मध निपटुनि घेते ॥
थोडा म्हणुनि मुळी न रुसते ॥
सांठवुनी तो जपुनि ठेविते ॥
उद्योगी मोठी ॥ ३ ॥

थोडाही गुण मिळता घ्यावा ॥
साठा त्याचा नित्य करावा ॥
कोणालाही तो शिकवावा ॥
ठेवा हे चित्ती ॥ ४ ॥

18. मधमाशी मध गोळा करण्यासाठी केव्हा जाते ?

(1) सायंकाळी (2) सकाळी

(3) दुपारी (4) मध्यान्हसमयी

19. मधमांशी दिवसभर काय करीत असते ?

(1) कष्ट करते (2) खात असते

(3) मधपीत असते (4) विश्रांती घेते

20. मधमाशीच्या अंगी कोणता गुण आहे ?

(1) उद्योगीपणा (2) आळशीपणा

(3) खादाडपणा (4) सुस्तपणा

21. 'संचय करणे' यासाठी कोणता समानार्थी शब्द वरील कवितेत आला आहे ?

(1) साठवणे (2) निपटून घेणे

(3) जमविणे (4) संचित करणे

22. मधमाशी आपणास कोणत्या गोष्टीचा साठा करण्याची शिकवण देते ?

(1) गुणाचा (2) धनाचा

(3) मधाचा (4) दोषांचा

23. चुकीच्या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.

(1) अभिवादन करणे—नमस्कार करणे

(2) नाक खुपसणे—मध्ये मध्ये बोलणे

(3) कीस काढणे—खूप चर्चा करणे

(4) खजील होणे—लाज न वाटणे

24. 'गाढवाला गुळाची............काय' ही म्हण अर्थपूर्ण होण्यासाठी खालीलपैकी कोणता शब्द योग्य आहे. त्याचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) आवड (2) चव

(3) नावड (4) गोडी

25. खालील अलंकारिक शब्दाचा अचूक अर्थ ओळखा.

'कोल्हेकुई' :

(1) क्षुद्र लोकांची ओरड

(2) निरर्थक बडबड

(3) कंटाळवाणे लांबलचक बोलणे

(4) कोल्ह्याचे ओरडणे

26. डावीकडे दिलेल्या शब्दाच्या विरुद्धलिंगी शब्दाचा पर्याय कोणता ते लिहा.

'जनक' :

(1) जानकी (2) जननी

(3) जन्मदाता (4) राजा

27. खालीलपैकी एकवचनी असलेल्या शब्दाचा पर्याय क्रमांक कोणता ?

(1) रात्र (2) दिवस

(3) कागद (4) भाऊ

28. खालील शब्दसमूहाबद्दल येणाऱ्या शब्दाचा योग्य पर्याय क्रमांक लिहा.

'चांदण्या रात्रीचा पंधरवडा' :

(1) शुक्लपक्ष (2) वद्यपक्ष

(3) कृष्णपक्ष (4) पितृपक्ष

29. खालीलपैकी 'विध्यर्थी' क्रियापद असणारे वाक्य सांगा.

(1) तो घरी गेला

(2) कृपया घरी जा

(3) त्याने घरी जावे

(4) तो घरी जाईल तर बरे होईल

30. ‘कायदा’ या शब्दाला कोणता उपसर्ग जोडल्यावर त्याचा विरुद्धार्थी शब्द तयार होईल ?

(1) ना (2) बिन

(3) गैर (4) बे

31. ‘तंटा’ या शब्दाचा खालीलपैकी कोणता समानार्थी शब्द आहे.

(1) शर्यत (2) युद्ध

(3) सामना (4) वाद

32. ‘ताईने राखी बांधली’ या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) कर्मणी प्रयोग

(2) कर्त्तरी प्रयोग

(3) अकर्मक भावे प्रयोग

(4) सकर्मक भावे प्रयोग

33. दिलेल्या प्रयोगाचे उदाहरण कोणते ते ओळखून त्याचा योग्य पर्याय क्रमांक लिहा.

**भावे प्रयोग** :

(1) तिने लेखन केले

(2) गुप्तहेर सेनापतीला माहिती पुरवितात

(3) राजाने सेवकास जवळ बोलावले

(4) शिपाई घोड्यावर बसले

34. खालीलपैकी तीन संधी एकाच नियमानुसार झाले आहेत. एक संधी वेगळ्या नियमानुसार झाला आहे, तो संधी ओळखून योग्य पर्याय क्रमांक लिहा.

(1) मतैक्य (2) क्षणैक

(3) सदैव (4) नाहीसा

35. खालील प्रश्नात डावीकडे दिलेल्या शब्दाचा संधी सोडवणारा योग्य पर्याय क्रमांक लिहा.

**'दिगंबर'** :

(1) दिग् + अंबर (2) दिक् + अंबर

(3) दि: + अंबर (4) दिगं + अंबर

36. खालीलपैकी शुद्ध शब्दाचा पर्याय क्रमांक ओळखून लिहा.

(1) दीपावली (2) किर्तन

(3) निर्मीत (4) धैर्यशिल

37. 'अंगण' या शब्दातील अनुस्वाराचा उच्चार ज्या शब्दातील अनुस्वारासमान होतो, त्या शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) मंथन (2) घंटा

(3) चंचल (4) संकट

38. योग्य जोडी ओळखा व त्याचा पर्याय क्रमांक लिहा :

(1) प्रथमा—स, ला, ते—स, ला, ना, ते

(2) द्वितीया—ने, ए, शी—नी, ही, ई, शी

(3) तृतीया—नो

(4) पंचमी—ऊन, हून—ऊन-हून

39. खाली दिलेल्या अधोरेखित शब्दाचा कारकार्थ ओळखा व योग्य पर्याय क्रमांक लिहा :
'मुलगा <u>पुस्तक</u> वाचतो'.

(1) कर्ता (2) कर्म

(3) करण (4) संबंध

40. खालील रिकाम्या चौकोनात पर्यायातील कोणत्या गटाची सर्व अक्षरे वापरल्यास दिलेले शब्द अर्थपूर्ण होतील ?

☐ निक ☐ निक ☐ निक

(1) दै, ध, सा (2) वै, सै, दै

(3) सै, दै, ध (4) सै, दै, पौ

41. खालीलपैकी ज्ञानेश्वरांची ग्रंथसंपदा कोणती नाही. अचूक पर्याय ओळखून लिहा.

(1) गीताई (2) अमृतानुभव

(3) भावार्थ दीपिका (4) चांगदेव पासष्टी

42. खालील वाक्यातील काळ ओळखा :

'आम्ही सिनेमा पाहत आहोत.'

(1) पूर्ण वर्तमानकाळ (2) अपूर्ण वर्तमानकाळ

(3) अपूर्ण भूतकाळ (4) अपूर्ण भविष्यकाळ